# पदवी प्रथम वर्गाच्या परीक्षा सोमवारपासून


## सर्व महाविद्यालयांची तयारी पूर्ण : ऑनलाईनचे स्वरूप

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सूचनेनुसार कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांमध्ये सोमवार (दि. ३ मे) पासून पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षांना प्रारंभ होणार आहे. त्याबाबतची तयारी महाविद्यालयांनी पूर्ण केली आहे. ही परीक्षा ऑनलाईन स्वरूपात होणार आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने विद्यापीठाने द्वितीय, तृतीय वर्षाबरोबरच प्रथम वर्षाची परीक्षा ऑनलाईन घेण्याचा निर्णय घेतला. त्यातील पदवी प्रथम वर्षाची परीक्षा घेण्याची जबाबदारी महाविद्यालयांवर सोपविली. त्यानुसार गेल्या दोन आठवड्यांत महाविद्यालयांनी परीक्षा घेण्याची तयारी केली. ज्या महाविद्यालयांत कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखांचे अभ्यासक्रम आहेत, त्यांनी सोमवारपासून, तर एक-दोन विद्याशाखांचे अभ्यासक्रम असणाऱ्या महाविद्यालयांनी बुधवार (दि. ५ मे) पासून परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे. त्याबाबतच्या वेळापत्रकाची माहिती महाविद्यालय प्रशासनाकडून विद्यार्थ्यांना दिली आहे.

दरम्यान, विद्यापीठाने पदवी, पदव्युत्तर विविध २७ अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा शुक्रवारी घेतली. त्यासाठी एकूण २८,९६५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २८,१०७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. ८५८ विद्यार्थी अनुपस्थित राहिले.

# कर्मवीर भाऊराव पाटील व्याख्यानमाला आजपासून




कोल्हापूर, ता. ३० : रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, महाविद्यालय विकास समिती व 'आयक्यूएसी'च्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील स्मृतिदिनानिमित्त उद्या (ता. १) पासून ऑनलाईन व्याख्यानमाला होणार आहे. पाच मेपर्यंत रोज सायंकाळी साडेचारला ही व्याख्याने होणार असून संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांची उपस्थिती असेल.

पहिले पुष्प 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात गुंफणार असून ते 'छत्रपती शिवाजी महाराज आणि औरंगजेब एक तुलनात्मक दृष्टिक्षेप' विषयावर संवाद साधतील. अध्यक्षस्थानी सरोज पाटील असतील. दोन मे रोजी 'कोविड-१९ चा ग्रामीण जीवनावरील परिणाम' या विषयावर डॉ. ज्ञानदेव तुळेले, तीन मे रोजी 'कोविड-१९ आणि राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती' विषयावर सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार संवाद साधतील. चार मे रोजी 'कोविड-१९ आणि सामान्य नागरिक' विषयावर डॉ. निरंजन शहा आणि पाच मे 'रयत शिक्षण संस्थेची शतकोत्तर वाटचाल आणि डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील' विषयावर डॉ. अनिल पाटील संवाद साधतील. माहितीसाठी समन्वयक डॉ. संजय साठे यांच्याशी संपर्क साधावा. व्याख्यानांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. टी .साळुंखे यांनी केले आहे.

# डॉ. परशराम पाटील यांची नेहरू फेलोशिपसाठी निवड



डॉ. पाटील

**चंदगड, ता. ३०** : गुडेवाडी (ता. चंदगड) येथील परशराम पाटील यांची प्रतिष्ठेच्या नेहरू फेलोशिपसाठी निवड झाली आहे. ही फेलोशिप नेहरू मेमोरियल म्युझियम लायब्ररी, नवी दिल्ली या संस्थेकडून दिली जाते. दरवर्षी काही निवडक संशोधकांची निवड केली जाते.

ज्यांचे संशोधन जगभर गाजले आहे, असे सामाजिक शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, इतिहासकार यांचा यात समावेश असतो. पंतप्रधान नेहरू मेमोरियल म्युझियम लायब्ररी संस्थेचे अध्यक्ष असतात. डॉ. पाटील 'भारतीय शेतीचे बदलते अर्थकारण' या विषयावर फेलोशिपच्या माध्यमातून संशोधन करणार आहेत. ही फेलोशिप मिळवणारे डॉ. पाटील शिवाजी विद्यापीठाचे पहिले विद्यार्थी आहेत. पाटील यांचा प्रवास एका ग्रामीण खेड्यातून सुरुवात होऊन आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ इथपर्यंत पोहोचला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील काजू उद्योगाचे भवितव्य या विषयावर पीएच. डी. केली. सध्या ते युनायटेड नेशन्स, एशियन डेव्हलपमेंट बँक आणि इतर संस्था यांच्यासोबत आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ म्हणून काम करतात.

# गोखले कॉलेजतर्फे कॅम्पसचे आयोजन

कोल्हापूर : गोपाळ कृष्ण गोखले कॉलेजतर्फे इन्फोसिस या आंतरराष्ट्रीय कंपनीसाठी बीए, बीकॉम, बीबीएम, बी.एससी, बीसीए, बीबीए च्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या मुलाखतीसाठी २०२०-२१ या शैक्षणिक तृतीय वर्षात शिकत असणारे विद्यार्थी पात्र असतील. ही मुलाखत ऑनलाईन घेतली जाणार असून त्यासाठी ७ मे पर्यंत नाव नोंदणी करणे गरजेचे आहे. तरी विद्यार्थ्यांनी www.gkgcollege.com या वेबसाईटला भेट द्यावी असे आवाहन प्राचार्य डॉ. पी. के. पाटील व एस. आर. घाटगे यांनी केले आहे.

# विद्यापीठात तुकडोजी महाराज यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती शुक्रवारी साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याहस्ते संत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

# विद्यापीठात आज ध्वजवंदन नाही

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज, शनिवारी महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन करण्यात येणार नाही. मात्र, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के सकाळी आठ वाजता ऑनलाईन स्वरूपात शुभसंदेश देणार आहेत. कोरोनाबाधितांची वाढती संख्या विचारात घेऊन महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन तसेच अन्य कार्यक्रम विद्यापीठात होणार नाहीत.